# पुणे प्राईम न्यूज

जनमानसाचा निडर आवाज...

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक २४३ | रविवार, २९ मार्च २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210



BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER


## संक्षिप्त

### भारती विद्यापीठ परिसरात गॅस गळतीमुळे चार कामगार होरपळले

**पुणे, ता. २८ :** भारती विद्यापीठ परिसरातील एका उपाहारगृहात गॅसगळती झाल्यानंतर चार कामगार होरपळले. कामगारांना गंभीर दुखापत झाली नाही. मिळालेल्या माहितीनुसार, भारती विद्यापीठ परिसरात नादब्रम्ह इडली हे उपाहारगृह आहे. शुक्रवारी सायंकाळी उपाहारगृहात गॅस गळती झाली. भडका उडाल्याने भटारखान्यात काम करणारे चार कामगार होरपळले. या घटनेची माहिती अग्निशमन दलाला मिळाली. अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी पोहोचेपर्यंत नागरिकांनी कामगारांना खासगी रुग्णालयात दाखल केले. कामगारांच्या हात आणि पायाला किरकोळ स्वरुपाची दुखापत झाली आहे. अग्निशमन दलाच्या जवानांनी गॅस गळती रोखली. गॅस गळती झाल्यानंतर भडाका उडाला. उपाहारगृहातील छताचे नुकसान झाले, तसेच खिडक्यांचा काचा फुटल्या. जवानांनी उपाहारगृहाची पाहणी केली. तेथे व्यावसायिक वापराचे दोन सिलिंडर आढळून आले. गॅसगळती रोखल्यानंतर उपाहारगृहाची पाहणी केली. धोका नसल्याची खात्री केल्यानंतर जवान तेथून रवाना झाले.

# देशात लॉकडाऊन नाही; नरेंद्र मोदींचे टीम इंडियासह एकत्र काम करण्याचे आवाहन

## १५ राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसोबत चर्चा

## बैठकीत महत्त्वाचे निर्णय, प्रशासनाला सतर्कतेच्या सूचना

**मुंबई, ता. २८ :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसोबत एक महत्त्वाची ऑनलाईन बैठक घेतली. सध्या देशात लॉकडाऊन लागू होणार असल्याच्या चर्चा सुरू होत्या. या पार्श्वभूमीवर मोदी यांनी स्पष्ट सांगितले की, देशात लॉकडाऊन लागू करण्याचा कोणताही निर्णय घेतलेला नाही. लोकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये आणि घाबरून जाण्याची गरज नाही, असा स्पष्ट संदेश त्यांनी दिला.

या बैठकीत मोदी यांनी केंद्र आणि राज्यांनी एकत्र येऊन काम करण्यावर भर दिला. टीम इंडिया म्हणून सर्वांनी एकाच दिशेने काम केल्यास कोणतेही संकट सहज हाताळता येते, असे त्यांनी सांगितले. सध्या जगभरात वेगवेगळ्या अडचणी निर्माण झाल्या आहेत, पण



भारताने शांतपणे आणि एकजुटीने काम केले तर परिस्थिती नियंत्रणात ठेवता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मोदी यांनी सरकारच्या प्राधान्यक्रमांबद्दलही स्पष्टपणे सांगितले. देशात आर्थिक स्थिती स्थिर ठेवणे, ऊर्जा पुरवठा सुरळीत ठेवणे आणि नागरिकांच्या गरजा पूर्ण करणे या गोष्टींवर विशेष लक्ष दिले जात आहे. तसेच, बाजारात आवश्यक वस्तूंचा तुटवडा निर्माण होऊ नये यासाठी पुरवठा साखळी व्यवस्थित चालू ठेवणे खूप महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. उद्योग आणि व्यापारही सुरळीत चालू राहणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

याचबरोबर साठेबाजी आणि जास्त दराने विक्री करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. काही लोक कृत्रिम तुटवडा निर्माण करून फायदा घेण्याचा प्रयत्न करतात, अशांवर लक्ष ठेवण्यास सांगितले गेले. राज्यांनी प्रशासनाच्या मदतीने अशा प्रकारांना आळा घालावा, असे मोदी यांनी स्पष्ट केले.

कृषी क्षेत्राबाबतही या बैठकीत सविस्तर चर्चा झाली. विशेषतः खतांचा पुरेसा साठा आणि त्याचे योग्य वेळी वितरण यासाठी आधीच तयारी करणे आवश्यक असल्याचे मोदी यांनी सांगितले. खरीप हंगाम जवळ येत असल्याने शेतकऱ्यांना कोणतीही अडचण येऊ नये, याची काळजी घेण्याचे त्यांनी राज्यांना सांगितले. बदलत्या परिस्थितीत वेळेवर निर्णय घेणे आणि सर्व यंत्रणांमध्ये समन्वय ठेवणे खूप गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

सीमावर्ती आणि किनारपट्टीवरील राज्यांबाबतही विशेष सूचना देण्यात आल्या. या भागांमध्ये जहाजवाहतूक, गॅस आणि इतर आवश्यक वस्तूंचा पुरवठा सुरळीत राहणे महत्त्वाचे असल्याचे सांगितले गेले. कोणतीही अडचण निर्माण झाल्यास तातडीने उपाययोजना कराव्यात, असे निर्देश देण्यात आले.

या बैठकीत अफवा आणि चुकीची माहिती पसरवण्याबाबतही गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली. लोकांपर्यंत योग्य आणि विश्वासार्ह माहिती पोहोचवणे ही राज्यांची जबाबदारी असल्याचे मोदी यांनी सांगितले. अफवांमुळे लोकांमध्ये भीती पसरते आणि परिस्थिती अधिक बिघडू शकते, त्यामुळे अशा गोष्टींवर नियंत्रण ठेवणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या बैठकीला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संरक्षणमंत्री राजनाथ सिंग, तसेच अनेक राज्यांचे मुख्यमंत्री आणि केंद्रशासित प्रदेशांचे प्रतिनिधी उपस्थित होते. एकूण १५ राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी या बैठकीत सहभाग घेतला. महाराष्ट्राच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याची भूमिका मांडली. त्यांनी केंद्र सरकारसोबत पूर्ण सहकार्य करण्याची भूमिका पुन्हा स्पष्ट केली.

दरम्यान, एकंदर पाहता, या बैठकीत देशात स्थिरता राखणे, नागरिकांमध्ये विश्वास निर्माण करणे आणि केंद्र-राज्य यांच्यात चांगला समन्वय ठेवणे यावर भर देण्यात आला. लोकांनी घाबरून न जाता शांत राहावे आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असा स्पष्ट संदेश या बैठकीतून देण्यात आला.




### कात्रज येथे डंपरच्या धडकेत दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू

**पुणे, ता. २८ :** भरधाव डंपरच्या धडकेत दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना कात्रज-कोंढवा रस्त्यावर घडली. अपघातानंतर पसार झालेल्या डंपर चालकाविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला. अनिकेत राम बनचर (वय-२२, रा. सेवक रस्ता, कुंभार वाडा, परभणी) असे मृत्युमुखी पडलेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. याबाबत अनिकेतचा भाऊ अभिषेक (वय-२४) याने येवलेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार, डंपर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुचाकीस्वार अनिकेत हा कात्रज-कोंढवा रस्त्यावरुन मार्च रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास निघाला होता. खडी मशीन चौक परिसरात भरधाव डंपरने दुचाकीस्वार अनिकेतला धडक दिली. अपघातात तो गंभीर जखमी झाला. अपघातानंतर घटनास्थळी न थांबता डंपर चालक पसार झाला. अनिकेतला रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच तो मरण पावला होता. पोलीस उपनिरीक्षक पंकज खराडे तपास करत आहेत.

# लक्ष्मी हॉस्पिटलमध्ये सव्वा चार लाखांची वीजचोरी उघड; महावितरणची कारवाई

**लोणी काळभोर, ता. २८ :** हवेली तालुक्यातील मांजरी रोडवरील कदमवस्ती परिसरातील लक्ष्मी हॉस्पिटलमध्ये मोठ्या प्रमाणावर वीजचोरी केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून, महावितरणच्या भरारी पथकाने छापा टाकून तब्बल ४ लाख २९ हजार २८० रुपयांची वीजचोरी झाल्याचे उघड केले आहे. या प्रकरणी लोणीकंद पोलीस ठाण्यात संबंधितांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महावितरणच्या या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली असून, मोठ्या व्यावसायिक आस्थापनांमधील वीजचोरीवरही आता कठोर कारवाई होणार असल्याचे संकेत मिळत आहेत.




महावितरणच्या भरारी पथकाच्या उपकार्यकारी अभियंता दिप्ती अनिल पाटील या सप्टेंबर २०२४ पासून मुळशी विभागात कार्यरत असून वीजचोरी प्रकरणांवर कारवाई करणे त्यांच्या जबाबदारीत येते. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी त्यांनी व त्यांच्या सहकारी अधिकाऱ्यांसह लक्ष्मी हॉस्पिटलच्या वीजजोडणीची तपासणी केली असता मोठा गैरप्रकार समोर आला.

तपासणीदरम्यान हॉस्पिटल व त्याच इमारतीतील घरगुती वीजजोडणीसाठी असलेले मीटर तपासले असता, एलटी पोलवरून येणारी सर्व्हिस वायर मीटरला न जोडता थेट डीपी स्विचला जोडून वीज वापर सुरू असल्याचे आढळले. हा प्रकार सरळसरळ वीजचोरीत मोडत आहे. तपासात उघड झालेल्या माहितीनुसार, हॉस्पिटलसाठी मागील ४४ महिन्यांपासून २१ हजार ३९२ युनिट वीज अनधिकृतरीत्या वापरली गेली असून त्यामुळे महावितरणला ३ लाख २९ हजार ५८० रुपयांचे नुकसान झाले आहे. तपासणीवेळी ३ .४५ किलोवॅट इतका जोडभार आढळून आला.

याचप्रमाणे घरगुती मीटरसाठीही डीपी स्विचद्वारे वीज वापर केल्याचे निदर्शनास आले. मागील ३५ महिन्यांत ५ हजार १८८ युनिट वीज अनधिकृतरीत्या वापरल्याने महावितरणचे ९९ हजार ७०० रुपयांचे नुकसान झाले असल्याचे नोंदविण्यात आले आहे. वीजचोरीसाठी वापरलेले वायर, डीपी स्विच आणि इतर साहित्य पंचांसमक्ष जप्त करून सील करण्यात आले. ४.२९ लाखांची थकबाकी अद्याप न भरल्याने गुन्हा हॉस्पिटल व घरगुती अशा दोन्ही मीटरच्या वीजचोरी व तडजोड रकमेचा एकूण आकडा ४ लाख २९ हजार २८० रुपये इतका असून, ही रक्कम अद्याप न भरल्याने संबंधित अबोली जयसिंग कदम व जयसिंग बबन कदम यांच्याविरोधात भारतीय विद्युत कायदा २००३ च्या कलम १३५ अंतर्गत लोणीकंद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# हवेली तालुक्यातील नादुरुस्त हातपंपांना मिळणार नवे जीवन : युवराज काकडे

**लोणी काळभोर, ता. २७ :** उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर वाढत्या पाणीटंचाईचा सामना करणाऱ्या हवेली तालुक्यातील गावांसाठी दिलासादायक निर्णय घेण्यात आला असून, नादुरुस्त अवस्थेत बंद पडलेले हातपंप तातडीने दुरुस्त करण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहेत. अशी माहिती हवेली पंचायत समितीचे सभापती युवराज हिरामण काकडे यांनी दिली आहे.

तालुक्यातील अनेक गावांमध्ये भूगर्भातील पाण्याची पातळी घसरल्याने पाणीटंचाई तीव्र झाली आहे. काही ठिकाणी हातपंपांचे पाणी आटले असले तरी अनेक ठिकाणी पाणीसाठा उपलब्ध असूनही हातपंप नादुरुस्त असल्याने ग्रामस्थांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. वर्षानुवर्षे देखभाल न



झाल्यामुळे अनेक हातपंप गंजून निकामी झाले आहेत.

या परिस्थितीची दखल घेत हवेली पंचायत समितीच्या वतीने बंद पडलेल्या हातपंपांची तातडीने दुरुस्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी तालुक्यातील सर्व गावांतील व वाड्या-वस्त्यांवरील बंद हातपंपांची यादी संकलित करण्याचे काम सुरू करण्यात येणार आहे. सभापती युवराज काकडे यांनी ग्रामस्थ व स्थानिक पदाधिकाऱ्यांना आवाहन करताना सांगितले की, ज्या ठिकाणी हातपंपांमध्ये पाणी असूनही ते केवळ तांत्रिक बिघाडामुळे बंद आहेत, अशा हातपंपांची माहिती त्वरित जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांकडे द्यावी. प्राप्त यादीच्या आधारे प्राधान्याने दुरुस्ती करण्यात येईल. गेल्या काही वर्षांत वाड्या-वस्त्यांवर टप्प्याटप्प्याने विंधन विहिरी खोदून त्यावर हातपंप बसविण्यात आले होते.

सुरुवातीला हे हातपंप गावांसाठी मोठा आधार ठरले; मात्र कालांतराने देखभाल अभावी अनेक हातपंप बंद पडले. आता या सर्व हातपंपांना पुन्हा कार्यान्वित करण्यावर पंचायत समितीने भर दिला आहे.

### पाणीटंचाईतून गावांना मिळणार दिलासा

हातपंप सुरू झाल्यास टँकरवरील अवलंबित्व कमी होऊन ग्रामीण भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. उन्हाळ्याच्या तीव्रतेत वाढ होण्यापूर्वीच ही मोहीम पूर्ण करण्याचा पंचायत समितीचा प्रयत्न असल्याची माहिती प्रशासनाने दिली. या निर्णयामुळे हवेली तालुक्यातील पाणीटंचाईग्रस्त गावांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले असून, बंद हातपंप पुन्हा सुरू होण्याची ग्रामस्थांना प्रतीक्षा लागली आहे.

# मांजरीत घरकाम करणाऱ्या महिलेने लांबवले २१ लाखांचे दागिने

**लोणी काळभोर, ता. २८ :** घरकाम करणाऱ्या महिलेने कपाटातील हिऱ्यांचे स्टड (कानातील दागिने) आणि चांदीची भांडी असा एकूण २० लाख ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेल्याचा प्रकार नुकताच उघडकीस आला आहे. मांजरी बुद्रुक (ता. हवेली) येथील 'मांजरी ग्रीन' (फेज ३) या उच्चभ्रू वस्तीतील एका रो-हाऊसमध्ये हि घटना घडली आहे.

याप्रकरणी घरमालक कामना पवन कौशल (वय ४५, रा. मांजरी ग्रीन, मांजरी बुद्रुक) यांनी मांजरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार मांजरी पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून मध्यप्रदेशातील एका महिलेवर संशय व्यक्त करण्यात आला आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी कामना कौशल या विमाननगर येथील एका कंपनीत नोकरीला आहेत. त्यांच्या घरी डिसेंबर २०२५ पासून छोटी बाई कर्राम (रा. मध्यप्रदेश) ही महिला घरकाम करण्यासाठी आली होती. ती बंगल्याच्या तिसऱ्या मजल्यावरील सर्व्हंट रूममध्ये राहत होती. मात्र, १९ फेब्रुवारी २०२६ पासून ती कोणालाही काहीही न सांगता अचानक घर सोडून निघून गेली होती.

गुरुवारी (ता. २६) दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास रामनवमी आणि कन्या पूजनाची तयारी करत असताना, फिर्यादी यांनी कपाटातील पूजेची चांदीची भांडी शोधली. मात्र, कपाटात भांडी दिसून आली नाहीत. अधिक तपासणी केली असता, अडीच लाख रुपयांच्या चांदीच्या भांड्यांसोबतच १८ लाख रुपये किमतीचे हिऱ्यांचे कानातील स्टडदेखील गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.घरातील सदस्यांकडे चौकशी करून आणि सर्वत्र शोध घेऊनही दागिने व भांडी न मिळाल्याने चोरी झाल्याची खात्री झाली. एकूण २० लाख ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरी झाल्याचे आढळून आले.

दरम्यान, कामना कौशल यांनी या चोरीबाबत घरकाम करणाऱ्या छोटी बाई कर्राम हिच्यावर संशय व्यक्त केला आहे. डिसेंबर २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत ही चोरी झाली असून, मांजरी पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# हवेलीतील ग्रामपंचायतींचे प्रलंबित मुद्रांकशुल्क अनुदान तात्काळ वितरित करा

## सभापती युवराज काकडे यांची जिल्हा परिषदेकडे मागणी

**लोणी काळभोर, ता. २८ :** हवेली तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या हक्काचे मुद्रांकशुल्क अनुदान अद्याप प्राप्त न झाल्यामुळे गावपातळीवरील अनेक महत्त्वाची विकासकामे ठप्प झाली आहेत. या पार्श्व भूमीवर, हवेली पंचायत समितीचे सभापती युवराज हिरामण काकडे यांनी पुणे जिल्हा परिषदेचे उपमुख्यकार्यकारी अधिकारी भूषण जोशी यांची भेट घेऊन प्रलंबित निधी तात्काळ वितरित करण्याची आग्रही मागणी केली आहे.

मार्च अखेर जवळ आली असतानाही निधीअभावी पाणीपुरवठा, रस्ते, पथदिवे आणि स्वच्छतेसारख्या मूलभूत



सुविधांची कामे रेंगाळली आहेत. निधी उपलब्ध नसल्याने नवीन कामांचे नियोजन करणे कठीण झाले असून, तालुक्यातील अनेक ग्राम पंचायतींकडून पंचायत समितीकडे निधीबाबत वारंवार विचारणा केली जात आहे. ग्रामपंचायतींच्या आर्थिक अडचणी लक्षात घेऊन हा निधी तत्काळ मिळणे आवश्यक असल्याचे सभापती काकडे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

राज्य शासनाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाची मुदत ३१ मार्च २०२६ रोजी संपत आहे. या अभियानांतर्गत अनेक लोकोपयोगी योजनांची अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे. मात्र, मुद्रांकशुल्काचा निधी वेळेत वर्ग न झाल्यास या योजनांच्या पूर्ततेत तांत्रिक अडचणी निर्माण होऊन तालुक्यातील ग्राम पंचायती या महत्त्वाकांक्षी अभियानात मागे पडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सभापती युवराज काकडे यांनी जिल्हा परिषदेच्या पंचायत विभागाकडे पाठपुरावा करताना स्पष्ट केले की, ग्राम पंचायतींच्या खात्यावर हा निधी लवकरात लवकर वर्ग झाल्यास मार्चअखेरची धावपळ कमी होईल आणि प्रलंबित कामे वेळेत पूर्ण होतील. उपमुख्यकार्यकारी अधिकारी भूषण जोशी यांनी या निवेदनाची दखल घेऊन सकारात्मक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे. दरम्यान, हवेली तालुक्यातील गावांच्या सर्वांगीण विकासासाठी हक्काचा निधी मिळवण्याकरिता सभापतींनी केलेल्या या प्रयत्नांचे तालुक्यातील सरपंच आणि ग्रामस्थांकडून स्वागत केले जात आहे.

पुणे प्राईम न्यूज



## संक्षिप्त

### गांजा विक्री प्रकरणी तरुणाला अटक

**पुणे, ता. २८ :** चिखलीतील जाधववाडी परिसरात गांजा विक्रीसाठी बाळगणाऱ्या एका तरुणाला पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून १० हजार ५०० रुपये किंमतीचा गांजा जप्त करण्यात आला. ही कारवाई बुधवारी ( मार्च) रोजी सायंकाळी साडेपाच वाजताच्या सुमारास करण्यात आली. अविनाश धनाजी गोरे (१९, जाधववाडी, चिखली) असे अटक आरोपीचे नाव आहे. त्याच्या एका साथीदाराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथकातील पोलीस अंमलदार कपिलेश इगवे यांनी चिखली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी सायंकाळी साडेपाच वाजताच्या सुमारास आरोपी अविनाश गोरे याच्याकडून २१० ग्रॅम वजनाचा १० हजार ५०० रुपये किंमतीचा गांजा जप्त करण्यात आला. त्याच्याकडे मिळालेल्या गांजाबाबत चौकशी केली असता त्याने तो गांजा दुसऱ्या आरोपीकडून विक्रीसाठी आणला असल्याचे निष्पन्न झाले. चिखली पोलीस तपास करत आहेत.

### अल्पवयीन चोरट्याने हिसकावली साडेचार लाखांची सोनसाखळी

**पुणे, ता. २८ :** म्हाळुंगे येथील घाटे वस्ती परिसरात दुचाकीवरून आलेल्या अल्पवयीन चोरट्याने एका व्यक्तीच्या गळ्यातील सुमारे चार लाख ४४ हजार रुपये किमतीची सोन्याची साखळी खेचून नेली. ही घटना गुरुवारी (२६ मार्च) रोजी दुपारी पावणे चार वाजताच्या सुमारास घडली.पोलिसांनी अल्पवयीन आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणी ३८ वर्षीय व्यक्तीने उत्तर म्हाळुंगे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी दुचाकीवरुन जात होते. ते म्हाळुंगे येथील घाटे वस्ती परिसरात आले असता आरोपीने मागून दुचाकीवरून येत फिर्यादी यांच्या गळ्यातील ३५ ग्रॅम वजनाची चार लाख ४४ हजार रुपये किंमतीची सोन्याची साखळी जबरदस्तीने खेचून पळ काढला. या प्रकरणाचा तपास उत्तर म्हाळुंगे पोलीस करत आहेत.

### मोटार चालकाने गॅस सिलिंडर फेकून मारला

**पुणे, ता. २८ :** म्हाळुंगे येथील निघोजे परिसरात भरधाव कार चालविणाऱ्या चालकाने वादातून एका व्यक्तीवर गॅस सिलिंडर फेकून मारला. तसेच दगडाने मारहाण केली. ही घटना घटना बुधवारी (२५मार्च) रोजी रात्री आठच्या सुमारास घडली. याप्रकरणी ३० वर्षीय तरुणाने दक्षिण म्हाळुंगे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार मोटार चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने भरधाव वेगाने मोटार चालवत फिर्यादीच्या दिशेने येताच फिर्यादीने बाजूला उडी मारली. त्यानंतर वाद झाल्याने आरोपीने संतापून जवळच्या गॅरेजमधील पाच किलो वजनाचा गॅस सिलिंडर फेकून मारला तसेच दगडाने कपाळावर मारून करून जखमी केले. तसेच बुक्क्यांनी मारहाण करत धमकीही दिली. तपास दक्षिण म्हाळुंगे पोलीस करत आहेत.

### दापोडीत तरुणांवर जीवघेणा हल्ला; सहा जणांविरुद्ध गुन्हा

**पुणे, ता. २८ :** दापोडीत जुन्या वादाच्या कारणावरून सहा जणांनी एकत्र येत दोन तरुणांवर लोखंडी रॉड, बांबू व बिअरच्या बाटल्यांनी हल्ला करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. ही घटना बुधवारी (दि. २५ मार्च) रोजी रात्री साडेआठच्या सुमारास घडली. नन्या उर्फ जयप्रकाश पंडीत (२२), संदेश गजभिव (२३), रोहन बनसोडे (२३), डेविड उर्फ मोन्या पाटोळे (२२), प्रथमेश चलवारे (२४, सर्व रा. जयभीम नगर, दापोडी) यांना अटक करण्यात आली आहे. महेश पवन गुळवे (२२, दापोडी) असे जखमी तरुणाचे नाव असून त्यांनी याबाबत दापोडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चार महिन्यांपूर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरून आरोपींनी आपसांत संगनमत करून बेकायदेशीर जमाव जमविला. त्यानंतर फिर्यादी व त्याचा मित्र यांच्यावर हल्ला केला. आरोपींनी खाली पाडून गळा दाबण्याचा प्रयत्न केला तसेच सिमेंट गट्टू, लोखंडी रॉड, बांबू व बाटल्यांनी मारहाण करून गंभीर जखमी करीत जिवे मारण्याचा प्रयत्न केला. तसेच आणखी दोघांना मारहाण करण्यात आली. या प्रकरणाचा तपास दापोडी पोलीस करत आहेत.

### चिखलीत घरगुती गॅसचा काळाबाजार

पिंपरी, ता. २८ : चिखलीतील चिंचेचा मळा परिसरात घरगुती गॅस सिलिंडरमधून अवैधरित्या गॅस रिफिलिंग करून साठा केल्याप्रकरणी एका तरुणाला अटक करण्यात आली आहे. ही कारवाई बुधवारी (२५ मार्च )रोजी रात्री साडेआठ वाजताच्या सुमारास करण्यात आली. रोहित प्रभाकर शिंदे (२७, मोरेवस्ती, चिखली) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. या प्रकरणी गुन्हे शाखेच्या मालमत्ता विरोधी पथकातील पोलीस अंमलदार समीर लक्ष्मण रासकर यांनी याबाबत चिखली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी रात्री साडेआठ वाजताच्या सुमारास आरोपीने कोणतीही सुरक्षितता न पाळता घरगुती गॅस सिलिंडरमधून इतर सिलिंडरमध्ये गॅस काढून साठा केला होता. यावेळी १३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यामध्ये गॅस सिलिंडरच्या रिकाम्या व भरलेल्या टाक्या, वजन काटा जप्त करण्यात आला. चिखली पोलीस तपास करत आहेत.

# उपमहापौरांच्या दालनातच हाणामारी; आंबेडकर जयंतीच्या वादातून कार्यकर्ते आमनेसामने

**पुणे, ता. २८ :** पुणे महापालिकेतील उपमहापौरांच्या दालनातच कार्यकर्त्यांमध्ये जोरदार हाणामारी झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. दोन गटांत जोरदार हाणामारीत एका कार्यकर्त्याला शर्ट फाटेपर्यंत मारले. या प्रकारामुळे उपमहापौरांचे कार्यालयच आता हाणामारीचा अड्डा बनले आहे का, असा संतप्त सवाल नागरिकांतून उपस्थित होत आहे.




भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या पार्श्वभूमीवर पुणे स्टेशन येथील पुतळ्याजवळ महापालिकेने एकच मंडप उभारण्याचा निर्णय घेतला आहे, मात्र काही कार्यकर्त्यांनी लावलेले छोटे मंडप काढण्यात आल्याने ताडीवाला रस्ता परिसरातील आंबेडकरवादी कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी होती. संबंधित कार्यकर्ते उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्याकडे तक्रार घेऊन पोहोचले. उपमहापौरांच्या दालनात आधीच उपस्थित असलेल्या दुसऱ्या गटातील कार्यकर्त्यांनी तुम्ही इथे वाढीव करायला आलात का? असा सवाल करताच वातावरण चिघळले.

> पुणे स्टेशन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ एक मंडप महापालिकेने काढल्याने काही कार्यकर्ते ही तक्रार घेऊन माझ्याकडे आले होते. ताडीवाला रस्ता भागातील कार्यकर्ते होते. माझ्या दालनात बसलेल्या एकाने त्यांना काहीतरी बोलले. त्यावरून त्यांच्यात भांडणे झाली. यापूर्वीचे काहीतरी वादाला कारण असू शकते.
> - **परशुराम वाडेकर,** उपमहापौर, पुणे महापालिका

काही क्षणांतच वादाचे रूपांतर हाणामारीतझाले.संतप्तकार्यकर्त्यांनी खुर्च्या अंगावर फेकत मारामारी सुरू केली. या धक्कादायक प्रकारात एका कार्यकर्त्याला शर्ट फाटेपर्यंत बेदम मारहाण करण्यात आली. मारहाण झालेल्या कार्यकर्त्यांनी तत्काळ आपल्या सहकाऱ्यांना महापालिकेत बोलावून घेतले. यामुळे परिसरात आणखी तणाव निर्माण झाला. मारहाण करणाऱ्या कार्यकर्त्याला ताब्यात देण्याची मागणी करत संतप्त कार्यकर्त्यांनी आक्रमक भूमिका घेतली. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याने सुरक्षा रक्षकांना पाचारण करण्यात आले. दरम्यान, उशिरापर्यंत दोन्ही गटांमध्येसमेटघडवून आणण्यासाठी उपमहापौरांच्या दालनात बैठक सुरू होती. या घटनेमुळे महापालिकेच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही टीका होत आहे.

### वीज बिलाचा भार होणार हलका

**पुणे, ता. २८ :** ऐन उन्हाळ्यात वीज दरात कपातीचा निर्णय वीज कंपन्यांनी घेतल्यामुळे सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. राज्यभरात १ एप्रिलपासून नवीन दर लागू होणार आहे. महावितरणने पाच वर्षात वीजदर कपातीसाठी मांडलेला प्रस्ताव मान्य करण्यात आला आहे. घरगुती, औद्योगिक, वाणिज्यिक अशा सर्व प्रवर्गातील ग्राहकांसाठीचे वीजदर २०३० पर्यंत टप्प्याटप्प्याने दरवर्षी कमी होणार आहेत. कोणत्याही प्रवर्गात वीजदर वाढणार नाहीत. नवीन दरपत्रकानुसार सर्वच युनिट स्लॅबमध्ये कपात करण्यात आली. महावितरणच्या २०२५-२६ ते २०२९-३० या पाच आर्थिक वर्षांच्या बहुवार्षिक वीजदर याचिकेवर महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने आपला आदेश प्रसिद्ध केला आहे. त्यानुसार महावितरण, बेस्ट, अदानी आणि टाटा पॉवर या प्रमुख वीज कंपन्यांनी सादर केलेल्या प्रस्तावाला राज्य वीज नियामक आयोगाने मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे घरगुती वीज ग्राहकांच्या खिशावरील भार कमी होणार आहे.

## तुळजाभवानी मंदिरात २२ तास दर्शन; चैत्री पौर्णिमा उत्सवासाठी प्रशासनाचा निर्णय

**तुळजापूर, ता. २८ :** साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेल्या तुळजापूरच्या तुळजाभवानी मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही चैत्री पौर्णिमा उत्सवाची तयारी जोरात सुरू झाली आहे. ३० मार्च ते ३ एप्रिल या ५ दिवसांच्या कालावधीत होणाऱ्या या उत्सवासाठी मंदिर प्रशासनाने विशेष नियोजन केले असून, भाविकांच्या सोयीसाठी मंदिर दररोज तब्बल २२ तास खुले ठेवण्याचा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे.



तुळजाभवानी देवी महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. विशेषतः चैत्रोत्सवाच्या काळात राज्यभरातून तसेच बाहेरील भागातूनही मोठ्या प्रमाणावर भक्त येथे दाखल होतात. आई राजा उदो उदोच्या जयघोषात होणारा हा उत्सव केवळ धार्मिक नसून सांस्कृतिक परंपरेचाही एक महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे गर्दीचे प्रमाण दरवर्षी वाढत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे.

याच पार्श्वभूमीवर यंदा दर्शन व्यवस्था अधिक सुलभ करण्यासाठी मंदिराचे दरवाजे दररोज रात्री १ वाजता उघडले जातील आणि रात्री ११ वाजता बंद केले जातील. म्हणजेच केवळ २ तास विश्रांतीनंतर पुन्हा दर्शन सुरू राहील. या निर्णयामुळे अधिकाधिक भाविकांना दर्शन घेता येणार असून, दीर्घ प्रतीक्षा टाळण्यास मदत होईल.

भाविकांची गर्दी सुरळीतपणे हाताळण्यासाठी बिडकर पायरीम र्गे दर्शन मंडपात प्रवेश दिला जाणार आहे. तसेच उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर मंदिर परिसरात विशेष सोयी करण्यात येत आहेत. सुवर्णेश्वर गणपती ते महाद्वार चौक या मार्गावर मोठे मंडप उभारले जाणार असून, रांगेत उभ्या असलेल्या भाविकांना उन्हाचा त्रास होऊ नये यासाठी सावलीची व्यवस्था केली जाईल. यासोबतच पिण्याच्या पाण्याचीही पुरेशी सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे.



### श्रीनगर–लेह महामार्गावर हिमस्खलन; ७ जणांचा मृत्यू

**श्रीनगर, ता. २८ :** जम्मू-कश्मीरमधील श्रीनगर ते लेह महामार्गावर आज दुपारी झालेल्या हिमस्खलनात ७ जणांचा जागीच मृत्यू झाला. जोजिला पासजवळ झालेल्या हिमस्खलनात डझनभर गाडय़ा ६ फुटांपेक्षा जास्त बर्फात दबल्या. त्यामुळे अनेकांना गाड्यांमधून बाहेर पडताच आले नाही. प्राप्त माहितीनुसार जोजिला पासजवळच्या झीरो पॉइंटजवळ ही घटना घडली. अचानक हिमस्खलन झाले आणि प्रचंड बर्फ मार्गावरील गाड्यावर आला. ट्रक, कार तसेच काही एयूव्ही गाड्या त्यात पूर्णपणे दबल्या. पोलिसांनी तत्काळ बचावकार्य सुरू केले. पाच जणांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले असून त्यांच्यावर उपचार करण्यात येत आहेत. मार्गावरून मलबा आणि बर्फ हटवल्यानंतर पुन्हा वाहतूक सुरू करण्यात आली.

## आयपीएलच्या दुसऱ्या सत्राचं वेळापत्रक जाहीर; १३ एप्रिलपासून उडणार धुरळा

**मुंबई, ता. २७ :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने आयपीएल २०२६ च्या हंगामासाठी दुसऱ्या टप्प्याचे वेळापत्रक जाहीर करताच क्रिकेट चाहत्यांमध्ये उत्साहाची लाट उसळली आहे. आधीच पहिल्या टप्प्यातील सामने निश्चित झाले होते, तर आता संपूर्ण स्पर्धेचे चित्र स्पष्ट झाले आहे.




या हंगामाची सुरुवात २८ मार्च रोजी रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू आणि सनराईझर्स हैद्राबाद यांच्यातील साम न्याने बंगळुरू येथील एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर होणार आहे. पहिल्या टप्प्यात २८ मार्च ते १२ एप्रिलदरम्यान २० सामने खेळवले जाणार आहेत.

यानंतर दुसरा टप्पा १३ एप्रिलपासून सुरू होऊन २४ मेपर्यंत चालणार आहे. या टप्प्यात एकूण ५० सामने खेळवले जाणार असून, मुंबई, दिल्ली, चेन्नई, कोलकाता, अहमदाबाद, हैदराबाद, लखनौ, जयपूर, धर्मशाला, रायपूर आणि न्यू चंदीगडसह देशातील १२ शहरांमध्ये सामने होणार आहेत. दुसऱ्या टप्प्याची सुरुवात सनराईझर्स हैद्राबाद विरुद्ध राजस्थान रॉयल्स या सामन्याने होणार आहे.

या दोन्ही टप्प्यांनुसार एकूण ७० सामने होणार असून, त्यानंतर प्लेऑफ आणि अंतिम फेरीचे सामने आयोजित केले जातील. मात्र, सेमीफायनल आणि फायनलच्या तारखा अद्याप जाहीर करण्यात आलेल्या नाहीत. पहिल्या टप्प्यातील काही महत्त्वाचे सामने म्हणजे मुंबई इंडियन्स विरुद्ध कोलकाता नाईट रायडर्स (२९ मार्च), चेन्नर सुपर किंग्स विरुद्ध राजस्थान रॉयल्स (३० मार्च) आणि मुंबई इंडियन्स विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू (१२ एप्रिल) हे सामने विशेष लक्षवेधी ठरणार आहेत.

दरम्यान, एकूणच पुढील दोन महिने देशभरात क्रिकेटचा जल्लोष पाहायला मिळणार असून, विविध शहरांमध्ये रंगणाऱ्या सामन्यांमुळे आयपीएल २०२६ हा हंगाम चाहत्यांसाठी पुन्हा एकदा मोठा उत्सव ठरणार आहे.

## चोरीच्या संशयातून बापाने पोटच्या मुलींना रात्रभर उलटे टांगले

### एकीचा तडफडून मृत्यू. एक जण गंभीर

**सांगली, ता. २८ :** सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्यातील बनपुरी गावातून समोर आलेली घटना केवळ धक्कादायक नाही, तर माणुसकीलाच हादरा देणारी आहे. चोरीच्या केवळ संशयावरून एका वडिलांनी आपल्या दोन मुलींवर अमानुष अत्याचार केल्याने १० वर्षांची सानिका हिचा मृत्यू झाला, तर ११ वर्षांची अनुजा गंभीर अवस्थेत रुग्णालयात उपचार घेत आहे.



ही घटना बुधवारी सायंकाळी सुमारे पाच वाजण्याच्या सुमारास घडली. स्थानिक माहितीनुसार, शेजाऱ्याच्या घरात चोरी झाल्याचा संशय या मुलींवर घेतला गेला. संतापाच्या भरात वडील नाना हैबत यम गर यांनी दोन्ही मुलींचे हात-पाय बांधून त्यांना घरातील पत्र्याच्या अँगलला उलटे टांगून ठेवले. पुढील संपूर्ण रात्र या निष्पाप मुली असह्य वेदनेने तडफडत होत्या. पाणी, पाणी अशी आर्त हाक देऊनही त्यांना मदत मिळाली नाही.

या घटनेचा सर्वात अस्वस्थ करणारा भाग म्हणजे, मुलींना अशा अवस्थेत सोडून आई-वडील घरात झोपले होते, तर बाहेर आजी-आजोबा होते. रात्रीच सानिकाचा मृत्यू झाला, मात्र सकाळी सुमारे ६ वाजता मुलींना खाली उतरवले गेले, तोपर्यंत खूप उशीर झाला होता. अनुजा बेशुद्ध अवस्थेत आढळली आणि तिला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले.

या प्रकरणात आणखी एक गंभीर बाब समोर आली आहे. घटनेची माहिती बाहेर जाऊ नये म्हणून कुटुंबीयांनी सानिकेचा अंत्यसंस्कार घाईघाईत करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. मात्र रुग्णालयात शुद्धीवर आल्यानंतर अनुजाने दिलेल्या माहितीमुळे संपूर्ण प्रकार उघडकीस आला.

## पुण्यात पोलीस भरती दरम्यान तरुणाचा मृत्यू; शिवाजीनगर मुख्यालयातील घटना

**पुणे, ता. २८ :** पोलीस भरती दरम्यान मैदानी चाचणीत धावताना एका २३ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शिवाजीनगर पोलीस मुख्यालायतील मैदानावर शनिवारी सकाळी घडली. सोळाशे मीटर धावण्याची चाचणी देत असताना अचानक त्याला फिट आली. मैदानात बेशुद्ध होऊन कोसळल्यानंतर त्याला तातडीने रुग्णलयात दाखल करण्यात आले.



उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय तज्ज्ञांनी सांगितले. पुरुषोत्तम बारकुल (वय २३, रा. देऊळगाव राजा, जि. बुलढाणा) असे मृत्युमुखी पडलेल्या तरुणाचे नाव आहे.

पुणे शहर दलातील भरती प्रक्रिया गेल्या महिन्याभरापासून सुरू आहे. शिवाजीनगर येथील पोलीस मुख्यालयातील मैदानावर मैदानी चाचणी घेण्यात येत आहे. शनिवारी सकाळी मैदानी चाचणी सुरू झाली. पुरुषोत्तम बारकुल हा मैदानी चाचणीत सहभागी झाला. भरती प्रक्रियेतील मीटर धावण्याची चाचणी ही कठीण मानली जाते. पुरुषोत्तम याने मैदानाला दोन फेऱ्या मारल्या, तिसऱ्या फेरीत अचानक त्याला अपस्माराचा झटका (फिट) आली. तो धावताना मैदानावरच कोसळला. त्यच्याबरोबर असलेल्या उमेदावारांच्या लक्षात हा प्रकार आला.

भरती प्रक्रियेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या लक्षात हा प्रकार आला. मैदानावर उपस्थित असलेल्या वैद्यकीय पथकाने त्याची प्राथमिक तपासणी केली. त्याच्या हृदयाचे ठोके मंद झाल्याचे निदर्शनास आले. त्याला तातडीने ससून रुग्णलयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच तो मरण पावल्याचे ससूनमधील वैद्यकीय तज्ज्ञांनी सांगितले.

## उरुळी कांचनमध्ये पडद्यामागच्या ‘रामदूतां’मुळे श्रीराम सोहळा उत्साहात संपन्न

### जिवंत ‘नरसिंह अवतार’ आणि ‘केरळ नृत्य’ ठरले विशेष आकर्षण

**उरुळी कांचन, ता. २८ :** प्रभू श्रीरामचंद्र की जय... अशा जयघोषात आणि अलोट गर्दीत उरुळी कांचन पंचक्रोशीतील रामनवमी शोभायात्रा आणि श्रीराम पादुका दर्शन सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. हजारो महिला, बालकेआणि नागरिकांची उपस्थिती असूनही, कोठेही हुल्लडबाजी न होता अत्यंत शिस्तीत हा सोहळा पार पडल्याने उरुळी कांचनने जिल्ह्या समोर एक नवा आदर्श ठेवला आहे.



यंदाच्या शोभायात्रेचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे प्रथमच सादर करण्यात आलेला नरसिंह अवतार हा जिवंत देखावा. हा देखावा पाहण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. तसेच, मिरवणुकीत खास आकर्षण म्हणून सादर करण्यात आलेले केरळ नृत्य सर्वांचे डोळे दिपवून टाकत होते. आकर्षक सजावट, डोळे दिपवणारी विद्युत रोषणाई आणि ‘राजदत्त साऊंड अँड लाईट’च्या दर्जेदार सेवेने मिरवणुकीत रंगत भरली. सोहळ्याच्या शेवटी करण्यात आलेल्या भव्य फटाक्यांच्या आतिशबाजीने आकाश उजळून निघाले होते.

साधारणपणे मोठ्या मिरवणुकांमध्ये पोलिसांना गर्दीवर नियंत्रण मिळवण्यासाठी मोठी कसरत करावी लागते. मात्र, उरुळी कांचनमध्ये चित्र वेगळे होते. रस्ते भाविकांनी गच्च भरले असतानाही प्रत्येकाने आपल्या शिस्तीचे भान राखले. या संयमामुळे पोलीस प्रशासनाला कोणालाही शिस्त लावण्याची साधी वेळ आली नाही. अलोट गर्दी असूनही शांततेत पार पडलेला हा सोहळा उरुळी कांचनच्या सुजाण नागरिकत्वाचे दर्शन घडवून गेला.

या अभूतपूर्व नियोजनाचे खरे श्रेय पडद्यामागून काम करणाऱ्या तरुणांना जाते. स्वतःचे नाव कुठेही पुढे न येऊ देता, गेल्या अनेक वर्षांपासून हे तरुण अहोरात्र राबत आहेत. उत्सवाच्या नियोजनापासून ते खर्चापर्यंत आणि मिरवणुकीच्या शिस्तीपासून ते भाविकांच्या सोयीपर्यंत प्रत्येक गोष्टीत या ‘रामभक्तांच्या फौजेने’ स्वतःला झोकून दिले होते.

#### आदर्श सोहळ्याची पंचक्रोशीत चर्चा

आजच्या काळात जिथे लहान कार्यक्रमातही गोंधळ होतो, तिथे हजारो लोकांच्या उपस्थितीत अशा प्रकारे शिस्तबद्ध आणि भव्य शोभायात्रा निघणे, हे संपूर्ण जिल्ह्यासाठी एक प्रेरणादायी उदाहरण ठरले आहे. उरुळी कांचनच्या या नियोजनबद्ध कार्यकर्त्यांचे आणि शिस्तप्रिय नागरिकांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# शिवद्रोही छिंदमला सभागृहाबाहेर हुसकावले; अहिल्यानगर पालिकेत अभूतपूर्व गोंधळ

**अहिल्यानगर, ता. २८ :** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पीय सभेत शुक्रवारी अभूतपूर्व गोंधळ उडाला. छत्रपती शिवाजी महाराजांबाबत वादग्रस्त विधानांमुळे आधीपासूनच वादात असलेला शिवद्रोही नगरसेवक श्रीपाद छिंदम सभागृहात बोलण्यासाठी उभा राहताच इतर नगरसेवक आक्रमक झाले. छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान करणाऱ्याला सभागृहात बोलू देणार नाही, अशी ठाम भूमिका घेत नगरसेवकांनी जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी संपूर्ण सभागृह दणाणून सोडले. छिंदमला अक्षरशः सभागृहाबाहेर हुसकावून लावले.



महापालिकेच्या अर्थसंकल्पीय सभेला सुरुवात होताच वातावरण तापले. सादर होणारे बजेट अधिकृत आहे का, असा प्रश्न उपस्थित करत छिंदमने प्रशासनावर निशाणा साधला. मात्र, छिंदम बोलू लागताच सभागृहातील अनेक नगरसेवक संतप्त झाले. नगरसेवक गणेश भोसले आणि संपत बारस्कर यांनी छिंदमला बोलण्यास विरोध करत, तुला बोलण्याचा अधिकार नाही, असा इशारा दिला. महिला नगरसेविकांनीही घोषणांमध्ये सहभाग घेतल्याने वातावरण अधिकच तापले.

मी निवडून आलेला लोकप्रतिनिधी आहे, मला बोलण्याचा अधिकार आहे, असे छिंदमने सांगितल्यानंतर आक्रमक नगरसेवकांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान करणाऱ्याला येथे स्थान नाही, असे म्हणत त्याच्याभोवती गर्दी केली. वाद चिघळत असताना छिंदमच्या समोरील माईक तोडण्यात आला. अखेर संतप्त नगरसेवकांनी छिंदमला सभागृहाबाहेर जाण्यास भाग पाडले.

घटनेनंतर वातावरण आणखी तणावपूर्ण झाले. महापौरांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. मात्र, आक्रमक नगरसेवकांनी स्पष्ट इशारा दिला की, छिंदमला पुन्हा सभागृहात प्रवेश दिल्यास आम्ही सभेला उपस्थित राहणार नाही. कोणत्याही परिस्थितीत त्याला सभागृहात येऊ न देण्याचा ठराव करावा, अशी मागणीही एकमताने करण्यात आली. यामुळे सभेचे कामकाज काही काळ ठप्प झाले. या वादामुळे पुढील सभांमध्येही संघर्षाची चिन्हे आहेत.

# स्थानिक गुन्हे शाखेच्या प्रमुखपदी प्रमोद क्षीरसागर

**पुणे, ता. २८ :** पुणे जिल्हा (ग्रामीण) पोलीस दलात महत्त्वपूर्ण प्रशासकीय बदल करत स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) प्रमुखपदी पोलीस निरीक्षक प्रमोद अंबादास क्षीरसागर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल यांच्या आदेशानुसार क्षीरसागर यांनी नुकताच पदभार स्वीकारून कामकाजाला सुरुवात केली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे जिल्ह्यातील गुन्हेगारी विरोधात अधिक कडक आणि परिणामकारक कारवाई होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर हे बदलीपूर्वी नियंत्रण कक्षात कार्यरत होते. प्रशासनिक



अनुभव आणि गुन्हे तपासातील पारंगतता लक्षात घेऊन त्यांच्यावर स्थानिक गुन्हे शाखेची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या बदलाकडे जिल्हा पोलीस दलातील महत्त्वाचा निर्णय म्हणून पाहिले जात आहे. पोलीस दलात क्षीरसागर यांची ओळख धडाडीचे, कठोर आणि तडफदार अधिकारी अशी आहे. गुन्हेगारांविरोधात कारवाई करताना ते कोणतीही तडजोड न करणारे अधिकारी म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यामुळेच सहकारी व नागरिकांमध्ये त्यांना गुन्हेगारांचा कर्दनकाळ अशी उपाधी मिळाली आहे.

क्षीरसागर यांनी आळे फाटा, शिक्रापूर, पुणे शहर, चतुर्श्रृंगी, वाकड, हिंजवडी, तळेगाव दाभाडे, चाकण तसेच सातारा जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये सेवा बजावताना अनेक गंभीर गुन्ह्यांचा यशस्वी तपास केला आहे. खून, खुनाचा प्रयत्न, बलात्कार, दरोडे, चोऱ्या आणि घरफोड्या यांसारख्या संवेदनशील गुन्ह्यांची उकल करून त्यांनी आपल्या कामाची वेगळी छाप उमटवली आहे. गुन्हे उघडकीस आणताना त्यांनी गुप्त माहिती जाळे मजबूत ठेवणे, तांत्रिक पुरावे गोळा करणे आणि जलद तपास यावर विशेष भर दिला.

दरम्यान, स्थानिक गुन्हे शाखा


> पुणे जिल्ह्यात गुन्हेगारी नियंत्रणासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे गुप्त माहिती जाळे अधिक सक्षम करण्यात येणार आहे. फरार आरोपींची शोधमोहीम तीव्र करण्यात येईल, तसेच संघटित गुन्हेगारीवर विशेष लक्ष केंद्रित करून कठोर कारवाई करण्यात येईल. नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ व्हावा, यासाठी पारदर्शक आणि वेगवान तपासावर भर देणार आहे.
> - **प्रमोद क्षीरसागर,** (प्रमुख, स्थानिक गुन्हे शाखा, पुणे ग्रामीण पोलीस)

ही जिल्ह्यातील संघटित गुन्हेगारी, दरोडे, घरफोड्या आणि फरार आरोपींच्या शोधासाठी महत्त्वाची यंत्रणा मानली जाते. त्यामुळे अनुभवी आणि आक्रमक शैलीत काम करणाऱ्या अधिकाऱ्याची गरज होती. त्या अनुषंगाने वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रमोद क्षीरसागर या खमख्या अधिकाऱ्याची नेमणूक केली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखा अधिक वेगाने आणि अचूकतेने कारवाई करेल, अशी अपेक्षा पोलीस दलासह सर्वसामान्य नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# महिला गाठ काढण्यासाठी आली पण डॉक्टरांनी गर्भपिशवीच काढली

## पाच डॉक्टरांचा अटकपूर्व जामीन फेटाळला

**पुणे, ता. २८ :** पुण्यातील मांजरी बुद्रुक परिसरातील एका खाजगी रुग्णालयात घडलेल्या गंभीर वैद्यकीय निष्काळजीपणाच्या प्रकरणात न्यायालयाने कठोर भूमिका घेतली आहे. गर्भाशयातील गाठ काढण्यासाठी आलेल्या महिलेची पूर्वसंमती न घेता तिचे संपूर्ण गर्भाशय काढल्याच्या आरोपावरून चार डॉक्टरांसह ५ जणांचा अटकपूर्व जामीन अर्ज अतिरिक्त सत्र न्यायाधीश सुमित जोशी यांनी फेटाळला.



ही घटना १५ सप्टेंबर २०२५ रोजी साई केअर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये घडली होती. केशवनगर परिसरातील ३५ वर्षीय महिला, जी ब्युटी पार्लर चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करते, तिने दिलेल्या तक्रारीनुसार २०२३ मध्ये सोनोग्राफी दरम्यान तिच्या गर्भाशयात लहान गाठ असल्याचे निदान झाले होते. उपचारासाठी ती १३ सप्टेंबर २०२५ रोजी संबंधित रुग्णालयात दाखल झाली. मात्र, गाठ काढण्याऐवजी तिचे संपूर्ण गर्भाशय काढण्यात आले, असा आरोप आहे.


या प्रकरणात डॉ. संदीप कराड, डॉ. मंदार साहुजी, डॉ. निहाल शेख, डॉ. शेहजाद शेख आणि सुरज कांबळे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सरकारी बाजूने ॲड. विश्वास सातपुते यांनी युक्तिवाद करत हा अत्यंत गंभीर प्रकार असल्याचे नमूद केले. संबंधित महिलेच्या संमतीशिवाय इतका मोठा शस्त्रक्रियेचा निर्णय घेणे हा केवळ निष्काळजीपणा नसून संभाव्य गुन्हेगारी कृत्य असल्याचा मुद्दा मांडण्यात आला.

तसेच, काढलेल्या गर्भाशयाचे पुढे काय झाले, त्यामागे कोणता हेतू होता, याची चौकशी आवश्यक असल्याचेही सांगण्यात आले. बारामती येथील पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयानेही उपचारात निष्काळजीपणा झाल्याचा प्राथमिक अहवाल दिल्यामुळे न्यायालयाने अटकपूर्व जामीन नाकारला.

या घटनेमुळे रुग्णांच्या संमतीचा अधिकार आणि खाजगी रुग्णालयां मधील वैद्यकीय नैतिकतेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. उपचारापूर्वी रुग्णाला संपूर्ण माहिती देणे आणि लेखी संमती घेणे ही मूलभूत जबाबदारी असताना अशा घटना घडणे चिंताजनक आहे. या प्रकरणाचा पुढील तपास आता अधिक महत्त्वाचा ठरणार आहे.

# इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांची क्रीडा-शैक्षणिक क्षेत्रात चमकदार कामगिरी

**लोणी काळभोर, ता. २८ :** लोणी काळभोर (ता. हवेली) येथील इंग्लिश मीडियम स्कूल ही शाळा केवळ शैक्षणिक गुणवत्तेसाठीच नव्हे तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांमुळे परिसरात विशेष ओळख निर्माण करत आहे. विद्यार्थ्यांच्या लपलेल्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी वर्षभर स्पर्धा, उपक्रम आणि विविध परीक्षांचे आयोजन केले जात असून त्याचा सकारात्मक परिणाम विद्यार्थ्यांच्या कामगिरीत दिसून येत आहे.



शैक्षणिक वर्षभरात विद्यार्थ्यांनी धावणे, कबड्डी, खो-खो यांसारख्या क्रीडा प्रकारांत उत्कृष्ट कामगिरी करत शालेय, आंतरशालेय तसेच जिल्हा व राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये अनेक पारितोषिके पटकावली आहेत. क्रीडाक्षेत्रासोबतच शैक्षणिक स्पर्धांमध्येही विद्यार्थ्यांनी आपल्या गुणवत्तेची छाप पाडली आहे.

शिष्यवृत्ती परीक्षा, नवोदय प्रवेश परीक्षा, क्रीडाक्षेत्रातील स्पर्धा, ऑलिम्पियाड तसेच डॉ. होमी भाभा परीक्षा यांसारख्या विविध स्पर्धात्मक परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. अनेक विद्यार्थी गुणवंत यादीत झळकत असून शाळेच्या शैक्षणिक दर्जाची साक्ष देत आहेत.

दहावीचा शंभर टक्के निकाल शाळेची खास ओळख दरवर्षी दहावीचा १०० टक्के निकाल लागणे ही या शाळेची विशेष परंपरा ठरली आहे. गुणवंत विद्यार्थ्यांसोबतच अभ्यासात मागे असलेल्या विद्यार्थ्यांवरही शिक्षकांकडून वैयक्तिक लक्ष देण्यात येते. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याचा शैक्षणिक स्तर उंचावण्यास मदत होत आहे.

आधुनिक शिक्षणपद्धती आणि अनुभवी शिक्षकवर्ग आधुनिक अध्यापन पद्धती, डिजिटल सुविधा, अनुभवी शिक्षकवर्ग आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रम यांचा उत्तम संगम या शाळेत पाहायला मिळतो. यामुळे पालकांचा शाळेवरील विश्वास दिवसेंदिवस अधिक दृढ होत आहे.







Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## बाजारातून कांदे बटाटे आणल्यावर अशापद्धतीने ठेवायला हवेत

फळे आणि भाज्या आपल्या दैनंदिन जीवनाचा एक भाग आहेत. आपल्या स्वयंपाकघरात विविध प्रकारच्या भाज्या आणि फळे ही कायम ठेवावीच लागतात. सर्व फळे आणि भाज्या वेगवेगळ्या प्रकारच्या पोषक तत्वांनी समृद्ध असतात. काही घरांमध्ये ' ळे आणि भाज्या दररोज किंवा आठवड्याभराच्या एकदा आणून ठेवल्या जातात. अशावेळी या भरपूर फळांची आणि भाज्यांची योग्य साठवणूक हा महत्त्वाचा भाग लक्षात घ्यायला हवा. खरंतर, काही फळे आणि भाज्या कधीही एकत्र ठेवू नयेत. असे केल्याने ते फळे किंवा भाजी खूप लवकर कुजण्यास आणि खराब होण्यास सुरुवात होते.

**कोणती फळे आणि भाज्या एकत्र ठेवू नये**

तुम्ही आणलेल्या भाज्या आणि फळांचे शेल्फ लाइफ वाढवायचे असेल, कोणती फळे आणि भाज्या एकत्र ठेवू नयेत हे जाणून घ्या.

**काकडी आणि टोमॅटो**

आपण अनेकदा फ्रीजमध्ये भाजीपाल्या सोबत काकडी आणि टोमॅटो एकत्र ठेवतो. काकडी आणि टोमॅटो एकत्र ठेवल्यास ते लवकर खराब होऊ लागतात. टोमॅटोमधून बाहेर पडणाऱ्या इथिलीन वायूमुळे काकडी लवकर कुजण्यास सुरुवात होते.

**स्ट्रॉबेरी आणि ब्लूबेरी**

उन्हाळ्यात येणारे स्ट्राबेरी आणि ब्लूबेरी एकत्र ठेवण्याची चूक करू नये. स्ट्रॉबेरीमधूनही इथिलीन वायू बाहेर पडतो. ज्यामुळे ब्लूबेरी लवकर कुजू शकतात. दुसरीकडे, ब्लूबेरी वजनाने थोडी जड असतात, त्यामुळे स्ट्रॉबेरी खराब होण्याचा धोका निर्माण होतो.

**बटाटे आणि कांदे एकत्र ठेवू नका**

बहुतेक घरांमध्ये बटाटे आणि कांदे एकत्र ठेवले जातात. परंतु बटाटे आणि कांदे कधीही एकत्र ठेवू नयेत. असे केल्याने बटाटे लवकर अंकुरतात. कांदे कुजायला लागल्यावर, कांद्यातून इथिलीन वायू बाहेर पडतो. त्यामुळे बटाटे खूप लवकर खराब होण्यास सुरुवात होते. कांदे बटाटे एकत्र ठेवल्यामुळे बटाट्यांमधून ओलावा बाहेर पडतो. त्यामुळे कांदा लवकर कुजण्यास सुरुवात होते. म्हणून या कांदे बटाटे कधीही एकत्र ठेवू नयेत.

# यवत पोलिसांचा गावठी हातभट्टीवर छापा; महिलेवर गुन्हा दाखल

## ४८ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी केला जप्त

**यवत, ता. २८ :** दौंड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील लडकतवाडी (सौदलवाडी) गावच्या हद्दीत बेकायदेशीररीत्या सुरू असलेल्या गावठी हातभट्टीवर यवत पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत दारू गाळण्याचे साहित्य आणि कच्चे रसायन असा एकूण ४८ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांची चाहूल लागताच संशयित महिला आरोपी अंधाराचा फायदा घेऊन पसार झाली आहे. हि कारवाई शुक्रवारी (ता. २७) रात्री पाऊणे अकरा वाजण्याच्या सुमारास करण्यात आली.

मंगल श्रीनिवास गुदडावत (रा. कासुर्डी, ता. दौंड) असे फरार झालेल्या महिलेचे नाव आहे.




याप्रकरणी यवत पोलीस ठाण्याचे हवालदार रामदास ज्ञानदेव जगताप यांनी यवत पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार महिलेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, यवत पोलीस ठाण्याचे हवालदार रामदास ज्ञानदेव जगताप आणि त्यांच्या पथकाला लडकतवाडी येथील सौदलवाडी परिसरात बेकायदा हातभट्टी सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार रात्री रात्री पाऊणे अकरा वाजण्याच्या सुमारास पोलिसांनी सदर ठिकाणी छापा टाकला.

यावेळी घराच्या जवळच मानवी जीवितास हानीकारक असलेल्या नशाकारक विषारी दारूची भट्टी धगधगत असल्याचे दिसून आले. पोलिसांना पाहताच आरोपी महिला मंगल गुदडावत ही पळून जाण्यात यशस्वी झाली. यावेळी पोलिसांनी १०० लिटर कच्चे रसायन यामध्ये नवसागर, गूळ, झाडाची सालं आणि भिजवलेली पोती असे ३८ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल मिळून आला. तसेच ३५००० रुपये किम तीचे ३५ लिटर तयार दारू आणि प्लॅस्टिक कॅन, व इतर साहित्य असा ४८ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दरम्यान, जप्त केलेले ११०० लिटर कच्चे रसायन हे अत्यंत विषारी आणि मानवी आरोग्यास घातक असल्याने पोलिसांनी ते जागीच नष्ट केले आहे. याप्रकरणी यवत पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (इछड) कलम १२३ आणि महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार भापकर करीत आहेत.

## अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना राज्य सरकारचा मोठा दिलासा

**पुणे, ता. २८ :** राज्य सरकारने पुरग्रस्त बाधित पशुपालकांना दिलासा दिला आहे. जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे पूरग्रस्त भागांमध्ये पशुधनाचे मोठे नुकसान होऊन अनेक जनावरे मृत्युमुखी पडली किंवा वाहून गेली.


या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने बाधित पशुपालकांसाठी विशेष मदत पॅकेज जाहीर केले आहे.

राज्य शासनाने राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीच्या निकषांमध्ये शिथिलता आणून, सर्व मृत किंवा बेपत्ता पशुधनासाठी तसेच गोठ्यांच्या नुकसानीसाठी सुधारित दराने मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. दरम्यान, मृत पशुधनासाठी शवविच्छेदन अहवाल, बेपत्ता प्रकरणात पंचनाम्याची प्रत, लाभार्थ्यांचा आधार व बँक खात्याची माहिती जोडणे बंधनकारक असेल.

# तळेगाव–चाकण–शिक्रापूर महामार्गासाठी राज्य सरकारचा ४९०१ कोटींचा अंतिम अध्यादेश जारी

**पुणे, ता. २८ :** पुणे जिल्ह्यातील वाहतुकीसाठी महत्त्वाचा ठरणारा तळेगाव-चाकण-शिक्रापूर (एनएच-५४८डी) महामार्ग अखेर प्रत्यक्षात येण्याच्या दिशेने मोठे पाऊल पडले आहे. महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा महामंडळामार्फत डीबीओटी तत्वावर हा रस्ता विकसित करण्याच्या काम ाला राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिल्यानंतर अंतिम अध्यादेशही जारी करण्यात आला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रकल्पामुळे परिसरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

सुमारे ५३ किलोमीटर लांबीचा हा मार्ग मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग आणि पुणे-संभाजीनगर महामार्गाला जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे.



औद्योगिकदृष्ट्या वेगाने विकसित होत असलेल्या चाकण परिसरामुळे या मार्गावर प्रचंड वाहतूक वाढली आहे. त्यामुळे तळेगाव ते शिक्रापूर दरम्यान वारंवार होणाऱ्या कोंडीमुळे वाहनचालकांना मोठा वेळ वाया जात होता. नव्या आराखड्यानुसार तळेगाव ते चाकण या सुमारे २८.३ किलोमीटर अंतरावर चार पदरी उन्नत (एलिव्हेटेड) मार्ग उभारला जाणार आहे, तर संपूर्ण ५३.२ किलोमीटर अंतरावर जमिनीवर चार पदरी रस्ता विकसित केला जाणार आहे. या मार्गावर १७१ लहान आणि ४ मोठे जंक्शन, तसेच वाहतुकीसाठी ४ ठिकाणी रॅम्पची सोय असणार आहे. एकूण ७ टोल नाके उभारले जाणार असून संपूर्ण टोल वसुलीची रिअल टाइम निगराणी केली जाणार आहे.

या प्रकल्पाची अंदाजित किंमत सुमारे ४९०१.६६ कोटी रुपये असून २५ वर्षांच्या टोल उत्पन्नावर आधारित आर्थिक मॉडेल तयार करण्यात आले आहे. प्रकल्पाचा एकूण सवलत कालावधी २९ वर्षांचा असेल. विशेष म्हणजे, अतिरिक्त टोल उत्पन्नात शासनाचाही वाटा असणार आहे, ज्यामुळे महसूल वाढण्याची अपेक्षा आहे.

दरम्यान, गेल्या दशकभरापासून रखडलेल्या या प्रकल्पाला आता गती मिळाल्याने मावळ, खेड आणि शिक्रापूर परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. वाहतूक सुलभ होण्याबरोबरच औद्योगिक आणि आर्थिक विकासालाही चालना मिळण्याची शक्यता आहे.




## सोलापूरात रंगणार महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचा महासंग्राम

**सोलापूर, ता. २८ :** स्व. सिद्धाराम साखरे यांच्या स्मरणार्थ निर्झरा केअर फाऊंडेशन आणि महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चौथी वरिष्ठ गट महिला महाराष्ट्र केसरी स्पर्धा २८ मार्चपासून सुरू होत आहे.

सोलापूरच्या सिद्धेश्वर पेठ परिसरातील हरिभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर ही स्पर्धा रंगणार असून, ४२ जिल्ह्यांतील ३५० हून अधिक महिला कुस्तीपटू यात सहभागी होणार आहेत.

यंदाच्या महिला महाराष्ट्र केसरी विजेतीला मानाची चांदीची गदा आणि किया सोनेट ही आलिशान कार देऊन गौरवण्यात येणार आहे. उपविजेत्या मल्लाला बुलेट दुचाकी, तर प्रत्येक वजनी गटातील सुवर्णपदक विजेतीला ५१ हजार रुपयांचे रोख बक्षीस मिळणार आहे. ट्रिपल महाराष्ट्र केसरी भाग्यश्री फंडच्या अनुपस्थितीत, अमृता पुजारी, अपेक्षा पाटील, सृष्टी भोसले आणि वाइल्ड कार्ड प्रवेश मिळालेली प्रतीक्षा बागडी यांच्यात कडवी झुंज पाहायला मिळेल.

# नायगाव येथे जीवराजजी महाराज सभागृह व जिल्हा परिषद शाळा खोल्यांचे उद्घाटन संपन्न

**उरुळी कांचन, ता. २८ :** संतांची पावन भूमी असलेल्या नायगाव (ता. हवेली) येथे ग्राम पंचायत कार्यालयाजवळ नवनिर्मित 'पूज्य श्री जीवराजजी महाराज सार्वजनिक सभागृह' आणि जिल्हा परिषद शाळेच्या दोन वर्ग खोल्यांचा लोकार्पण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. पूज्य गौरवमुनीजी म हाराज यांच्या मंगल सानिध्यात आणि शिरूर-हवेलीचे आमदार ज्ञानेश्वर उर्फ माऊली आबा कटके यांच्या शुभहस्ते हे उद्घाटन संपन्न झाले.

याप्रसंगी आमदार प्रताप पाटील चिखलीकर, आमदार बाबाजी काळे, माजी आमदार अशोकबापू पवार, उल्हासदादा पवार, ओमप्रकाश पोकर्णा, देविदास भन्साळी, दिलीप वाल्हेकर, पंचायत समितीचे सदस्य कृषिराज चौधरी, हिरामण तात्या



काकडे, गुलाब आबा चौधरी, रामदास चौधरी, बाळासाहेब चोरगे, ईश्वर कांकलिया, प्रकाश बोरा, रघुनाथ चौधरी, सुरज चौधरी राजेंद्र कांचन, बाळासाहेब धोका, शिरीष भन्साळी, प्रवीण नहार, महेश भन्साळी यांसह राजकीय, सामाजिक आणि जैन समाजातील अनेक प्रतिष्ठित मान्यवर उपस्थित होते.


उद्घाटनप्रसंगी बोलताना आम दार माऊलीआबा कटकेम्हणाले की, नायगावच्या सर्वांगीण विकासासाठी आणि ग्रामस्थांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी मी सदैव तत्पर आहे. येणाऱ्या काळात गावाला आवश्यक असलेली सर्व मदत शासनस्तरावरून मिळवून दिली जाईल. यावेळी जैन बांधवांच्या प्रतिनिधींनी एक महत्त्वाचा संकल्प सोडला. पूज्य जीवराजजी महाराज यांची जन्मशताब्दी पुढील वर्षी नायगाव येथे अत्यंत भव्य दिव्य स्वरूपात साजरी करण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले.

कार्यक्रमाला प्रशासक कल्याणी संदीप हगवणे, ग्रामसेविका विजया भगत, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक संजय पवार व सर्व शिक्षक कर्मचारी उपस्थित होते. तसेच गावातील आजी माजी पदाधिकारी यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ आणि महिला भगिनी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे स्वागत बाळासाहेब धोका यांनी केले, सूत्रसंचालन महेश लुंकड यांनी केले तर राजेंद्र चौधरी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# पुढील ३ महिन्यांत एलपीजी गॅसचा पुरवठा खंडित होण्याची शक्यता : मंत्री छगन भुजबळ

**मुंबई, ता. २८ :** आखाती देशांमधील वाढत्या युद्धजन्य तणावाचा थेट परिणाम भारतातील ऊर्जा पुरवठ्यावर दिसू लागला असून, महाराष्ट्रासह देशभरात एलपीजी गॅसच्या उपलब्धतेबाबत चिंता वाढत आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी केलेल्या वक्तव्यामुळे सामान्य नागरिकांच्या चिंतेत आणखी भर पडली आहे. पुढील ३ महिन्यांत एलपीजी गॅसचा पुरवठा खंडित होण्याची शक्यता केंद्र सरकारच्या पत्रकात सूचित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

दिल्लीत नुकत्याच पार पडलेल्या केंद्र सरकारच्या उच्चस्तरीय बैठकीनंतर भुजबळ माध्यमांशी बोलत होते. या बैठकीत देशातील एलपीजी पुरवठ्याची



सध्याची स्थिती, आंतरराष्ट्रीय बाजारातील चढउतार, तसेच युद्धामुळे निर्माण झालेल्या पुरवठा साखळीतील अडचणींचा आढावा घेण्यात आला. भारत मोठ्या प्रम ाणावर एलपीजीसाठी आयातीवर अवलंबून आहे, विशेषतः आखाती देशांमधून होणाऱ्या पुरवठ्यावर. या भागात अस्थिरता वाढल्याने जहाजवाहतूक, उत्पादन आणि वितरणावर परिणाम होण्याची शक्यता आहे.

या संभाव्य संकटाचा सामना करण्यासाठी पर्यायी उपाय म्हणून पीएनजी म्हणजे पाइपद्वारे पुरवठा होणाऱ्या नैसर्गिक वायूचा वापर वाढवण्यावर भर देण्यात येत आहे. भुजबळ यांनी सांगितले की, पीएनजी सध्या तुलनेने स्वस्त असून शहरी भागात त्याचा अधिक विस्तार करणे गरजेचे आहे. यासाठी महानगरपालिका आणि स्थानिक प्रशासनाने पुढाकार घेऊन नव्या इमारतींना पीएनजी कनेक्शन बंधनकारक करण्याचा विचार करावा, अशी सूचनाही त्यांनी केली.

सध्या पीएनजी जोडणीसाठी विविध विभागांकडून परवानग्या घेण्याची प्रक्रिया वेळखाऊ ठरते. मात्र आता या प्रक्रियेला गती देण्यासाठी २४ तासांत परवानग्या देण्याचा निर्णय घेतला असल्याचेही भुजबळ यांनी स्पष्ट केले.

सामान्य नागरिकांसाठी ही परिस्थिती महत्त्वाची आहे कारण एलपीजीवर अवलंबून असलेल्या घरगुती स्वयंपाक व्यवस्थेवर याचा थेट परिणाम होऊ शकतो. त्यामुळे पुढील काही महिन्यांत पर्यायी व्यवस्था, बचत आणि जागरूकता यावर भर देणे आवश्यक ठरणार आहे.

# शिंदवणे येथे गावठी पिस्तुलसह दोघेजण जेरबंद; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**उरुळी कांचन, ता. २८ :** उरुळी कांचन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शिंदवणे (ता. हवेली) गावच्या हद्दीत बेकायदेशीर शस्त्र बाळगणाऱ्या दोन अट्टल गुन्हेगारांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले आहे. गुरुवारी (ता. २६) रात्री साडेनाऊ वाजण्याच्या सुमारास काळेशिवार कॅनोल रोडपरिसरात हि कारवाई करण्यात आली आहे.

रियाज हुसेन मुलाणी (वय-३० रा. बगाडे मळा, उरुळी कांचन) व इक्बाल शमिम खान (वय-३१, रा. तुपेवस्ती, उरुळी कांचन) अशी अटक करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. त्यांच्याकडून एक लोखंडी गावठी पिस्तुल आणि दोन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत. विशेष म्हणजे, स्थानिक पोलीस या हालचालींबाबत अनभिज्ञ असल्याने उरुळी कांचन पोलीस नेमके करतात काय असा प्रश्न या निमित्ताने नागीरीकानी उपस्थित केला आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी (ता. २६) रात्री साडेनाऊ वाजण्याच्या सुमारास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस हवालदार योगेश नागरगोजे आणि त्यांचे पथक शिंदवणे परिसरात गस्तीवर होते. यावेळी काळेशिवार येथील कॅनॉल रोडवर दोन संशयित तरुण दुचाकीवरून जात असताना पोलिसांना आढळले. पथकाने शिताफीने त्यांना अडवून त्यांची झडती घेतली असता, त्यांच्याकडे विनापरवाना गावठी बनावटीचे पिस्तुल आणि पितळी धातूची दोन जिवंत काडतुसे मिळून आली. त्यांचाकडे चौकशी केली असता त्यांनी त्यांची नावे वरीलप्रमाणे सांगितली. त्यांच्या अंगाची झाडाझडती घेतली असता ५० हजार रुपये किमतीचे गावठी पिस्तुल आणि २ जिवंत काडतुसे, ५० हजार रुपये किमतीची होंडा कंपनीची दुचाकी, पल आणि सॅमसंग कंपनीचे महागडे मोबाईल फोन असा एकूण १ लाख ६२ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.


दरम्यान, याप्रकरणी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात दोघांवर भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५ आणि भारतीय न्याय संहिता कलम (५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्थानिक पोलिसांचे दुर्लक्ष? उरुळी कांचन आणि परिसरात गुन्हेगारीने डोके वर काढले असताना स्थानिक पोलिसांना या शस्त्रांची आणि गुन्हेगारांच्या हालचालींची पुसटशीही कल्पना नव्हती. स्थानिक गुन्हे शाखेने गावात येऊन ही कारवाई केल्याने, उरुळी कांचन पोलीस केवळ बघ्याची भूमिका घेत आहेत का? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. या कारवाईमुळे स्थानिक पोलिसांच्या 'गुप्तचार' आणि गस्तीवर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

# अजित पवारांच्या निधनाला दोन महिने पूर्ण; सुप्रिया सुळे, रोहित पवारांची भावूक पोस्ट

**बारामती, ता. २८ :** राज्याचे माजी उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे म ाजी राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांच्या निधनाला आज ( मार्च) दोन महिने पूर्ण होत आहेत. २८ जानेवारी रोजी अजित पवार मुंबई ते बारामती असा विमान प्रवास करत असताना त्यांचे विमान बारामती येथील धावपट्टीनजीक कोसळले होते. या घटनेनंतर राज्याच्या राजकारणासह देशभरात खळबळ उडाली. अपघातानंतर अजित पवारांचे पुतणे रोहित पवार हे घातपाताचा संशय व्यक्त करून आरोपांची राळ उडवून दिली. तर सुप्रिया सुळेंनीही लोकसभेत हा विषय उचलला.

अजित पवारांच्या निधनाला



दोन महिने झाल्याच्या पार्श्वभूमीवर आता खासदार सुप्रिया सुळे आणि आमदार रोहित पवार यांनी सोशल मीडियावर एका भावनिक पोस्ट शेअर केली आहे. सुप्रिया सुळे यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले, राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री आणि आपणा सर्वांचे लाडके अजितदादा यांना आपल्यातून जाऊन दोन महिने झाले. दादा जणू अजूनही आपल्या अवतीभवती आहेत असंच वाटतं. व्हि मिस यू दादा.

**सुप्रिया सुळे लोकसभेत**

**काय म्हणाल्या?**

अजित पवार यांच्या विमान अपघातातील मृत्यू प्रकरणाची कालमर्यादित चौकशीची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी लोकसभेत केली. जर राज्याच्या दिवंगत उपमुख्यमंत्र्याला न्याय मि ळत नसेल तर इतरांचे काय? असा प्रश्न लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात खासदार सुळे यांनी केला. तसेच याप्रकरणी एफआयआर दाखल न केल्याबद्दल राज्य सरकारवरही त्यांनी टीका केली.

आमदार रोहित पवार यांनीही एक्सवर पोस्ट शेअर केली आहे. त्यांनी पोस्टमध्ये लिहिले, आठवणींचे दोन महिने ये प्यार और संघर्ष आखिर तक चलता रहेगा रोहित पवार यांनी या कॅप्शनमध्ये जस्टीस फॉर अजितदादा असा हॅशटॅगही दिला आहे.

**कर्नाटकला FIR घेण्याचा अधिकार नाही**

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, रोहित पवार यांनी राहुल गांधींची भेट घेतली. त्यांनी बहुतेक कर्नाटकात जाऊन एफआयआर नोंदविण्याचा सल्ला दिलेला असू शकतो. कर्नाटकला झिरो एफआयआर घेण्याचा अधिकारच नाही. हा बेकायदेशीर एफआयआर आहे. कारण पीडित जेव्हा एफआयआर दाखल करण्याच्या परिस्थितीत नसतो, त्यावेळीच झिरो एफआयआर करता येतो. अशाप्रकारे झिरो एफआयआर घेण्याचे न्यायक्षेत्र कर्नाटकला बिलकूल नाही.